# गर्वबाधा

काळजीच्या गर्वबाधा जात आता बाधुनी
बंगले हे मन्मनीचे सर्व झाले बांधुनी
टाकली तोडून आता जाणिवांची जंगले
बोन्साय हे भोवतीचे सर्व झाले रोवुनी
नित्य आसू ढाळणारे भाव माझे कोरडे
ते इशारे लोचनांचे सर्व झाले देऊनी
बेरुख समाजाचे हे वागणे ना सोसते
अंत सारे सोसिकांचे सर्व झाले पाहुनी
मीच आहे सर्वज्ञानी वाटतो हा भ्रम मनी
भेटता भलताच कोणी गर्व गेला संपुनी॥

**– प्रकाश रामचंद्र क्षीरसागर**

--------------------